**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**शुक्रवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. शासकीय नोकरी म्हणजे देशसेवेत सक्रीय योगदान देण्याची संधी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन**

**2. नागपुरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप**

**3. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी कमाल २ अपत्यांचं निर्बंध हटवण्याचा तेलंगणा सरकारचा निर्णय**

**4. उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट, नागपुरसह गडचिरोली मध्ये पावसाची हजेरी**

**आता सविस्तर बातम्या …….**

**रोजगार मेळा**

शासकीय नोकरी म्हणजे देशसेवेत सक्रीय योगदान देण्याची संधी असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. १७ व्या रोजगार मेळाव्यात आज देशभरातल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. त्यावेळी दृकश्राव्य संदेशातून पंतप्रधानांनी सर्वांना संबोधित केलं. भविष्यातल्या भारतासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी नियुक्ती मिळालेल्या तरुणांना केलं, ते म्हणाले…

***आज आपको केवल सरकारी नियुक्ति नहीं मिली है, आप को राष्ट्र सेवा में सक्रिय योगदान देने का अवसर मिला है। मुझे एक विश्वास है। आप इसी भावना से काम करेंगे, ईमानदारी और सुचिता के साथ।आप भविष्य के भारत के लिए बेहतर व्यवस्थाएँ बनाने में अपनी भूमिका निभाएंगे।***

मुंबईत केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत, तर पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं.भारतीय टपाल विभागाच्या वतीने नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय राजनगर येथे आयोजित रोजगार मेळाव्यात आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते टपाल विभागात

नियुक्त झालेल्या 25 उमेदवारांना प्रतिनिधी स्वरूपात नियुक्तीपत्र वितरित करण्यात आले.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले.नागपुरात होणाऱ्या कार्यक्रमात 113 जणांना नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. नियुक्त झालेल्या उमेदवारांचा ग्रामीण डाक सर्विस ,टपाल विभाग ,या कार्यालयात प्रवेश होणार आहे. नव नियुक्त उमेदवारांशी संवाद साधला असता त्यांनी आपला मानस बोलून दाखवला, श्रेया दांडे यांची टपाल विभागात नियुक्ती झाली आहे -

***मी अकोला विभागामधून पोस्ट विभागामध्ये एबीपीएम या पदासाठी नियुक्ती झालेली आहे. आजच्या कार्यक्रमामध्ये नियुक्तीपत्र मिळाल्याबद्दल धन्यवाद आणि पोस्ट विभागामध्ये माझी नियुक्ती झाल्यास मी ते काम  एकदम निष्ठेने एकाग्रतेने  इमानदारीने कार्य करेल***

**नैसर्गिक शेती**

रासायनिक शेतीमुळे जमीन, पाणी आणि हवा प्रदूषित होत असून देशातील जमीन वाळवंटात रूपांतरित होत आहे. त्यामुळे भावी पिढीचे आरोग्य जपण्यासाठी नैसर्गिक शेती अनिवार्य असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राजभवन, मुंबई येथे आयोजित चर्चासत्रात केले. त्यांनी सांगितले की नैसर्गिक शेती उत्पादन वाढवते आणि पर्यावरणाचे रक्षण करते. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीचे हब निर्माण करण्याची घोषणा केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नैसर्गिक शेती ही देशाच्या भविष्यासाठी अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

**जीएसटी**

केंद्र सरकारने अनेक वस्तूंवर GST कमी केलेला आहे. त्यातल्या त्यात ऑटोमोबाईल सेक्टर ज्यात दुचाकी आणि चारचाकी मध्ये GST कमी केल्यामुळे सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असलेल्या वस्तू खरेदी करणे,आता  सोपे झालेले आहे. केंद्र सरकारने ऑटोमोबाईल सेक्टर मध्ये GST कमी केल्यामुळे ऑटोमोबाइल्स सेक्टरला बुस्ट मिळालेला आहे. मॅस्कॉट होंडा च्या  अनुराग मेश्राम  यांनी आकाशवाणीसोबत संवाद साधला

***मागच्या पाच वर्षामध्ये जेव्हा गाडींचा  रेट  जो जीएसटी रेट होता तो होता २८% पण त्यानंतर यावेळेस दसऱ्याला जेव्हा अनाऊन्स केल  होत कि १८% होणार आहे, त्यानंतर मग जीएसटी १८% असल्यामुळे कस्टमर लोकांचा आणि ग्राहकांचा प्रतिसाद खूप जास्त चांगला आलेला आहे आणि गाड्यांची विक्री पण खूप जास्त प्रमाणात झाली आहे जवळपास दोन हजारचा  आकडा आम्ही  अचिव्ह केलेला आहे गाड्यांच्या विक्रीचा .***

**उड्डाणपुल**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर शहरातील "वन-टाईम इम्प्रूव्हमेंट" आणि "सेतूबंधन अंतर्गत एल.सी. क्र. २८९ येथे उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या" भूमिपूजनाचा कार्यक्रम केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यमंत्री अड् आशीष जैसवाल  यांच्या उपस्थितीत आज  बाजार चौकात होत आहे.

**संतनगरी शेगाव**

दिवाळीच्या सलग सुट्ट्यांमध्ये बुलडाणा जिल्ह्यातल्या संतनगरी शेगाव मध्ये संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी दिसून येत आहे. राज्याच्या विविध भागातून आलेल्या हजारो पर्यटक तसंच भक्तांनी शेगावनगरी फुलून गेली आहे. दर्शनासाठी मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने समाधी दर्शन, श्रीमुख दर्शन, बारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था केली असून, भक्तांच्या सोयीनुसार भक्तनिवासामध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती संस्थांनच्या वतीने देण्यात आली.

**दोन अपत्य**

तेलंगणाच्या मंत्रिमंडळानं राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यासाठी दोन अपत्यांच्या निर्बंधाची अट रद्द करायला मान्यता दिली आहे. याबाबत यापूर्वी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगानं तेलंगणा मंत्रिमंडळानं तेलंगणा पंचायत राज अधिनियम, २०१८ च्या कलम २१ च्या पोटकलम ३ मध्ये सुधारणा करायला काल मंजुरी दिली. आता या सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार एक अध्यादेश जारी करून, तो राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठवणार असल्याचं तेलंगणाचे महसूल मंत्री पी. श्रीनिवास रेड्डी यांनी बातमीदारांना सांगितलं.

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, पक्षाच्या एक लाख व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे कार्यकर्त्यांशी संवाद साधला जातो आणि सरकारच्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवल्या जातात. या ग्रुपवरील कमेंट्सचा अभ्यास करून पक्षाची भूमिका ठरवली जाते अशी माहिती त्यांनी दिली.

**हवामान**

अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया हे जिल्हे वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान उद्या आणि परवा संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून या दरम्यान अधून मधून विजांच्या कडकडाटासह वादळी पर्जन्यमान राहू शकत असं हवामान विभागाने कळवलं आहे. येत्या काही तासात, वर्धा, गडचिरोली, भंडारा या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि हलक्या पावसाची शक्यता आहे.याशिवाय अकोला, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. आज संध्याकाळच्या सुमारास गडचिरोली आणि नागपुरात मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरींनी हजेरी लावली

**दिवाळी आणि छठ पूजा**

दिवाळी आणि छठ पूजेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा विचार करून मध्य रेल्वेने मुंबई-नागपूर दरम्यान अतिरिक्त सुपरफास्ट एसी विशेष गाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्र. 01005 सीएसएमटी-नागपूर विशेष 26 ऑक्टोबर रोजी सुटेल, तर गाडी क्र. 01006 नागपूर-सीएसएमटी विशेष 25 ऑक्टोबर रोजी रवाना होईल. 22 एसी एलएचबी डब्यांची ही गाडी दादर, ठाणे, नाशिक, भुसावळ, अकोला, वर्धा आदी ठिकाणी थांबेल. प्रवाशांनी या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

**शिववैभव किल्ले स्पर्धा**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा आणि शौर्यगौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रथमच “शिववैभव किल्ले स्पर्धा” आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन उद्या २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता सेवासदन शिक्षण संस्था, सीताबर्डी येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

*****